# आवाहन

**"शिवभावे जीवसेवा"** हा मंत्र घेऊन **"शिवसेवा प्रतिष्ठान"** सातत्याने कार्यरत आहे. समाजोत्थानाच्या या कार्यात जेवढा अधिक जणांचा सहभाग वाढेल तेवढे हे कार्य सुलभ, समाधानकारक होईल. हा जगन्नाथाचा रथ आहे, अखंड ओढावा लागणार आहे. आपल्या सारख्यांच्या हस्ते-परहस्ते सहकार्यानेच ही पूर्तता होऊ शकते, पूर्णत्वास जाऊ शकते. **या कार्यात पुढीलप्रमाणे आपल्याला सहभाग घेता येईल..**

**आपण काय करू शकतो...**

- स्वतः सदस्य होणे व सदस्य वाढवणे.
- उपक्रमात सक्रीय सहभाग घेणे
- संस्कार वर्ग चालवणे
- ग्राम विकास
- अभ्यासीका चालवणे
- वृक्षरोपण व संवर्धन
- रक्तगट सूची
- शासकीय नोकऱ्यांचा प्रचार आणि प्रसार
- राष्ट्रीय व प्रेरणा दिन साजरा करणे
- तरुणांना विविध विषयात मार्गदर्शन
- वाचनालय

**संस्थेच्या खात्यात स्वच्छेने आर्थिक देणगी थेट ऑनलाईन जमा करू इच्छिणाऱ्यांसाठी.**

**॥ शिवसेवा प्रतिष्ठान ॥**

**भारतीय स्टेट बँक**

Current A/C No - **38250999706**

IFS Code - **SBIN0006735**

लोणावळा

**संपर्क पत्ता:** स २, दामोदर कॉलनी, मि.न. naM. २४३/८, ए वार्ड, लोणावळा, ता. मावळ, जि .पुणे ४१०४०१.

**संपर्क क्रमांक:** ९९२३१७३७५३ / ९९२१०५००२१



## ।। शिवसेवा प्रतिष्ठान ।।

नोंदणी क्र. महा /२६२ /२०१७ / पुणे

# सेवाकार्य वार्तापत्र

## २०१७ ते २०२०

**संपर्क पत्ता:** स २, दामोदर कॉलनी, मि.न. naM. २४३/८, ए वार्ड, लोणावळा, ता. मावळ, जि .पुणे ४१०४०१. **संपर्क क्रमांक: ९९२३१७३७५३ / ९९२१०५००२१**

सेवा है यज्ञकुंड समिधासम हम जलें |
ध्येय महासागर में सारितरुप हम मिले |

## शिवसेवा प्रतिष्ठान ची स्थापना

आपला भारत हा एक प्राचीन आणि विशाल देश आहे. येथे नैसर्गिक, भौगोलिक विविधतेबरोबरच भाषा, भुषा, खान-पान, राहणीमान इ. गोष्टींमध्येही विविधता आढळून येते. तसेच शहरी, ग्रामीण, वनात राहणारे अशीही विविधता दिसते. अशा या विविधतेने नटलेल्या परंतु आंतरिक सूत्र एक असलेल्या समाजात कृषी, शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन, कला, क्रीडा, इ. विषयांमध्ये राष्ट्रहितैषी दृष्टिकोन घेऊन व ग्रामविकास, आपत्ती निवारण यांसारख्या विषयांमध्ये 'नरसेवा ही नारायण सेवा' हा भाव मनात ठेऊन सेवाभावी वृत्तीने काम करण्याच्या उद्देशाने **"शिवसेवा प्रतिष्ठान"** ची स्थापना करण्यात आली.

जगतगुरु संत तुकाराम महाराज व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत 'देहूरोड' येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून **१९ फेब्रुवारी २०१७** ला **'रेल्वे कामगार संघ' व "शिवसेवा प्रतिष्ठान"** यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्याचा शुभारंभ करण्यात आला.

समाजात कुठल्या विषयात सेवेची, सहाय्याची आवश्यकता आहे हे जाणून घेण्यासाठी प्रतिष्ठानने प्रथम ग्रामीण भागात जाऊन सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणातून असे लक्षात आले की, ग्रामीण भागातील तरुणांना शासकीय नोकरी मिळण्यासंदर्भात कसे प्रयत्न करावेत या विषयी मार्गदर्शन आवश्यक आहे, म्हणून पहिल्या टप्प्यात प्रतिष्ठानने या विषयातील तज्ञ व्यक्तिंचे योजना पूर्वक मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले. वडगाव, कामशेत, मळवली, चिंचवड आणि कुसगांव येथे प्रत्येकी एक अशा एकूण सात शिबिरांमधून एकूण ८०० तरुणांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

दुसऱ्या टप्प्यात स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम शिकवण्या साठी मळवली येथे सलग चार महिने अभ्यास वर्ग घेतले गेले. दर शनिवार, रविवार ३ शिक्षक तरुणांना मार्गदर्शन करत असत. या अभ्यासक्रमाचा लाभ सुमारे ८० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घेतला, ज्यामध्ये प्रामुख्याने अतिग्रामीण भागातील मुला-मुलींचा मोठा सहभाग होता. या अभ्यास वर्गात शिक्षकांबरोबरच रेल्वेचे अधिकारी व इतर तज्ञ व्यक्तींचेही मार्गदर्शन तरुणांना मिळाले. त्याचबरोबर सुमारे १००० जणांचे रेल्वे परिक्षेचे ऑनलाईन फॉर्म विनाशुल्क भरून घेतले गेले. या उपक्रमात इतरही अनेक सेवाभावी संस्थांचे सहकार्य लाभले.



" सब समाज को लिये साथ मे आगे है बढते जाना "

# ग्राम विकास: नागनाथ पार व ठाकूरवाडी (खंडाळा घाटातील गावे)



गिरिकुंदरातून घोर वनातून जे वसलेले जन |
अज्ञानाने, दारिद्र्याने पिढ्या पिढ्या पिचलेले जीवन ||
स्पर्श तयांना करू स्नेहमय जीवन त्यांचे उजळू कणकण |
हृदयातील सद्भावन जागवून सेवा भावे करूया अर्चन ||




## शाळा केंद्र मानून पुढील योजना पूर्ण केल्या..

सह्याद्रीच्या डोंगरातील खंडाळा यातील नागनाथ पार व ठाकुरवाडी या दुर्गम भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले, थंडी पासून बचाव व्हावा म्हणून स्वेटर वाटप केले.



# ग्राम विकास
# नागनाथ पार व ठाकूरवाडी



> जनसेवा ही ईश्वरभक्ती ।
> बोध यातला उमजूया ।।

सध्याच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात ई लर्निंगची आवश्यकता लक्षात घेऊन **“शिवसेवा प्रतिष्ठान”** व **रोटरी क्लब, पुणे** यांच्या सहकार्याने दोन्ही गावातील शाळांना २ संगणक संच देण्यात आले आहे.

नागनाथ पार या गावातील सर्व कुटुंबांना **कारलें, घोसाळी, दुधी भोपळा, लाल भोपळा, पापडी** इत्यादी वेल भाज्यांच्या बियाणांचे वाटप करण्यात आले. ज्यांचा उपयोग त्यांना थोडा आर्थिक हातभार लावण्यासाठी होऊ शकेल.



**बियाणांचे वाटप**



# वृक्ष दत्तक व संवर्धन योजना

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...







**वृक्ष दत्तक व संवर्धन योजना** या उपक्रमा अंतर्गत २०१९ या वर्षी नागनाथ पार व मावळ तालुक्यातील सुमारे ५० गावांमध्ये रानमेवा सहज उपलब्ध व्हावा व आर्थिक हातभार लावावा या हेतूने आंबा, फणस, जांभूळ, आवळा इत्यादी फळांची कलमी रोपे लावण्याचा उपक्रम झाला.

**या उपक्रमात साधारण १५० सहकाऱ्यांच्या आणि ७ समाजसेवी संस्थांच्या सहभागाने ५० पेक्षा अधिक गावांमध्ये संपर्क करून सुमारे १००० झाडांचे वृक्षारोपण केले.**

# अखंड भारत संकल्प दिन




संकटों पर मात कर यह राष्ट्र विजयी हो हमारा

### अखंड भारत संकल्प दिनांक १४ ऑगस्ट २०१९

१४ ऑगस्ट १९४७ रोजी रोजी खंडित झालेल्या मातृभूमीला पुन्हा अखंड करण्याचे ध्येय साध्य करण्याचा संकल्प या कार्यक्रमात करण्यात आला कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### पूरग्रस्तांना मदत - २०१९

सांगली व कोल्हापूर येथे आलेल्या पुरात झालेल्या हानी मध्ये देवले ग्रामस्थ व "शिवसेवा प्रतिष्ठान" ने खारीचा वाटा उचलला आहे व चांगली मदत केली.







# जागतिक आपदा "कोरोना" संकट व सेवा कार्य

२०१९ वर्ष जसे-जसे पुढे जात होते तसतशी जागतिक आपदा "कोरोना" ने सुमारे सर्व जग संकटातून जात होते. आपल्या देशात अनेक स्तरांवर विविध माध्यमांतून समाजातील गरजू बांधवाना मदतीचा हात मिळत होता...

मावळ तालुक्यात असंख्य हातावर पोट असणारी कुटूंब रोजंदारी शिवाय उपासमारीने त्रस्त झालेली होती. मदतीची आत्यंतिक गरज होती. **"शिवसेवा प्रतिष्ठान"** ने नागनाथ येथील प्रत्येक परिवाराकरितां घरपोहोच कोरडा धान्य शिधा वाटप हा उपक्रम राबवण्याचे ठरवले. अनेक मित्र-परिचित, संस्था व व्यक्तींचे मदतीचे हात पुढे आले.

**नागनाथपार येथील एकूण ५३ परिवाराकरितां घरहोपोच कोरडा धान्य शिधा वाटप हा उपक्रम राबवला गेला.** यासाठी आपल्या सारख्या मित्रमंडळी, दानशुर संस्था व व्यक्तिंचे सहकार्य लाभले आहे, खरं तर त्यामुळेच हे शक्य झाले...

लोणावळा जवळील तैलबैला, एकोले, भांबुर्डे, आडगाव येथे साधारण १६० कुटुंबाना तातडीने धान्य किट ची गरज आहे अशी माहिती मिळताच त्यादृष्टीने सर्वतोपरी सहकार्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला.







# जागतिक आपदा "कोरोना" संकट व सेवा कार्य

## IRCTC च्या सहयोगाने कर्वेनगर व पुणे स्टेशन येथे खिचडी वाटप

कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात अनेक ठिकाणी फारच विचित्र - विदीर्ण अवस्था पाहायला मिळत होती. अचानक आलेल्या या संकटाचा सामना तरी कसा करावा? हा अनेकांच्या मनातला यक्ष प्रश्न होता. त्यातही हातावर पोट असणाऱ्या, छोटे मजूर, कामगार, यांना तर उत्पन्न नाही आणि बाहेर LOCKDOWN मुळे काही मिळतही नाही, अक्षरशः पोटापाण्याचा प्रश्न अनेकांना भेडसावत होता.

रेल्वे प्रशासन ( IRCTC ) या बाबतीत छान उपक्रम करत होते, त्याच्या अनुषंगाने आणि रेल्वे प्रशासनाच्या (IRCTC) सहकार्याने **"शिवसेवा प्रतिष्ठानने"** सुद्धा आपला खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न केला. पुणे स्टेशन, कर्वेनगर या ठिकाणी साधेच पण स्वच्छ व पौष्टिक अन्न म्हणून "डाळ-खिचडी" चे गरजवंताना वाटप केले आणि या सत्कार्यात हातभार लावण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी याचा लाभ घेतला.





**डाळ-खिचडी वाटप**






# चक्रिवादळ
# नागनाथ गावा साठी मदत



## जून २०२० चे चक्रिवादळ

जून २०२० ला चक्रिवादळात अनेकांचे अतोनात नुकसान झाले होते, नेहमी जातो त्या नागनाथ गावची स्थिती तर फारच विदारक झाली होती, संपुर्ण गावात एकाही घरावर छप्परच राहील नव्हतं, अनेक घरांची पडझड झाली होती.

**"शिवसेवा प्रतिष्ठान"** ने तातडीची मदत म्हणुन किमान वेगवेगळ्या मापाचे १५० पत्रे, व त्याला बसवण्याच्या वायर अन् खिळ्यांसकट तातडीने मदत पाठवली. शिवसेवा संस्थे च्या कार्यकर्त्यांनी नागनाथ गावात घरा वरील पत्रे देण्याचे ठरवले. तसे आवाहन करण्यात आले, सर्वांनी धावपळ केली आणि सकाळी गावकऱ्यांना बोलावुन रु.६०,०००/- चे पत्रे गावात पोहचले. घरे दुरुस्तीचे काम वेगात सुरु झाले. हे सर्व आपण सर्वांनी संस्थेवर विश्वास दाखवुन लगेच केलेल्या मदतीमुळेच... **खुप खुप धन्यवाद** !!

"शिवसेवा प्रतिष्ठान" टीम मधील सहकाऱ्यांतर्फे सुमारे ३००० हजार कौले देण्यात आली

खंडाळा घाटातल्या 'नागनाथ' गावावर आलेले चक्रीवादळाचे संकट आणि मदतीची आवश्यकता होती ११० सोलापुर चादरी चे वाटप केले. भारतीय रेल्वे पुणे विभागा तर्फे १०० ब्लँकेट ची तातडीने मदत केली.







शिवसेवा प्रतिष्ठान

# कार्यकारिणी

| | | संपर्क |
|---|---|---|
| श्री.धनंजय सदानंद चंद्राते | अध्यक्ष | ९९२३१७३७५३ |
| श्री. अजित अनंत घमंडे | उपाध्यक्ष | ९९२२९३५५९० |
| श्री. राजेश दत्तात्रय कामठे | सचिव | ९४२२५६१०८३ |
| श्री. सुनील श्रीपतराव व्हरांबळे | खजिनदार | ९९२१०५००२१ / ९३७०७२१४९१ |
| श्री. राजेश रामचंद्र येवले | सदस्य | ८९७५९९०४५६ |
| श्री. प्रल्हाद व्यंकटेश देशपांडे | सदस्य | ९४२०४९५३०४ |
| सौ. नीलाक्षी सुनील गोडबोले | सदस्य | ९७६४२८९०८९ |

